# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 19(3) अन्वये अपील क्रमांक 1185/2007.

श्री.प्रकाश मंगरूजी राउत,
मु. खोकरला, पो. मोहदुरा,
कोचे गॅस गोडावूनचे मागे,
खात रोड, भंडारा. ..... अपीलकर्ता

विरूध्द

श्री.डॉ. आर. सी. भैसारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. जे.एस.झाडे
जनमाहिती अधिकारी तथा,
कक्ष अधिकारी,
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, भंडारा. ..... उत्तरवादी

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.11.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या कलम 19(3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक 12.3.2008 रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 21.7.2006 रोजी दिनांक 19.7.2006 रोजी आपल्या कार्यालयात मी ''पशुधन पर्यवेक्षक पदविका धारकाला वगळून पदवीधारकाची निवड केल्याबाबत'' अर्ज सादर केलेला होता. त्या अनुषंगाने खालील माहिती दयावी. 1) 'पशुधन पर्यवेक्षक पदाकरिता पदविका धारकाची निवड करण्यात यावी. सदर जागेवर

पदवीधारकाची निवड करण्यात येवू नये असा महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय असतांना भंडारा जिल्हा परिषद मध्ये 'पशुधन पर्यवेक्षक' पदाकरिता श्री.रामचंद्र रामकृष्ण निखारे या पदवीधारकाची (बी.व्हीएससी., एम.व्हीएससी.) निवड करण्यात आली. सदर निवड ही अवैध असून या प्रकरणात दोषी असणा–या अधिका–यांची नावे मला कळविण्यात यावीत. 2) स्वतःचे काम न करता जनतेला त्रास देणा–या या अधिका–या विरूध्द काय कारवाई केली जाईल व ती होण्यास किती वेळ लागेल ? 3) दिनांक 19. 7.2006 रोजी या संबंधाने आपल्या कार्यालयास अर्ज सादर केला होता. अर्जावर आता पर्यंत काय कारवाई करण्यात आली ते कृपया मला कळवावे. हा अर्ज कोणत्या अधिका–याकडे केंव्हा पोहचला, त्याच्याजवळ तो किती दिवस राहिला व या कालावधीत त्याने काय कार्यवाही केली. 4) अर्जावर ज्या अधिका–यांना त्यावर कार्यवाही करणे आवश्यक होते पण त्यांनी ती केली नाही अशा अधिका–यांची नावे मला कळविण्यात यावीत. 5) सदर जागेवर (पशुधन पर्यवेक्षक पदाकरिता) माझी निवड केंव्हा करण्यात येईल व मला केंव्हा न्याय मिळेल. सबब वरील पाचही मुद्यांची सूंपर्ण व पुरेपुर माहिती लेखी स्वरूपात मला माहितीच्या अधिकारा अंतर्गत 48 तासाच्या आत दयावी. (जिवित व वित्त स्वरूपाची बाब असल्याने) सबब आपण माहितीच्या अधिकाराला अधिन सदर विषयाची त्वरित माहिती द्यावी ही सविनय विनंती.

3. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक 31.7.2006 रोजी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांनी 5 मुद्यांवर अपीलकर्ता यांना माहिति उपलब्ध करून दिलेली आहे. सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 11.9.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक 4.10.2006 रोजी अपीलकर्ता यांना पुन्हा माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

4. पशुधन पर्यवेक्षक पदाच्या नवीन भरती प्रकरणाबाबत जिल्हा पशुधन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांनी पदवीधारकास नेमणूका दिल्याबाबत आपणांस तक्रार करीत आहे. जिल्हा परिषद भंडारा पशुधन संवर्ग अधिकारी यांनी जाहिरात दिनांक 25.1.2006 अन्वये नवीन भरती करण्याकरिता जाहिरात दिली. त्या जाहिरातीमध्ये पदवीधारक विद्यार्थ्यांस जाहिरातीनुसार बोलविण्यात आलेले नाही. तरी त्यांचे अर्ज कसे कां स्विकारले. मला अर्जदारास यांचा खात्रीदायक संशय आहे. अशा नेमणूका महाराष्ट्र शासनाच्या दिनांक 29.6.2006 च्या विरूध्द व नेमणूक पदवीकाधारक विद्यार्थी लेखी परीक्षेत गुणवत्तेत उत्तीर्ण होवून ही व मुलाखतीत उत्तीर्ण होवूनही सुध्दा हेतुपुरस्सर म्हणजे दृष्टहेतूने पदविकाधारक विद्यार्थ्यास वगळले. माझेवर झालेला अन्याय दुर करावा ही विनंती असे द्वितीय अपील मेमोमध्ये नमुद केले आहे.

5. अपीलकर्ता यांना दिनांक 31.7.2006 रोजी जी माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे ती त्यांच्या दिनांक 21.7.2006 च्या अर्जातील मुद्याप्रमाणे उपलब्ध करून दिल्याचे दिसून येते. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये मुद्या क्रमांक 2 व मुद्या क्रमांक 5 मध्ये ज्या पध्दतीने माहिती विचारलेली आहे (सदरची माहिती) ती अधिनियमाचे (तरतुदीप्रमाणे) व्याप्ती मध्ये येत नाही. त्यातही 48 तासाचे आंत द्यावी असेही म्हटले आहे. परंतु जिवित व वित्त स्वरूपाची बाब असल्याने 48 तासाचे आंत माहिती उपलब्ध करून देण्याची तरतुद असली तरी अर्जात विचारलेल्या माहितीवरून जिवित व वित्तीय स्वरूपाची बाब दिसून येत नाही त्यामुळे सदरची मागणी अर्जदाराची गैरलागू आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी जी विनंती केली आहे ती अर्थातच माहितीचा अधिकार अधिनियम–2005 च्या (तरतुदी) व्याप्तीमध्ये येत नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाचे अधिकार कक्षे बाहेरील आहे. अधिनियमाचे कलम 2 प्रमाणे ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या दोन संज्ञेची व्याख्या दिलेली आहे व त्याप्रमाणे सार्वजनिक

प्राधिकरणात माहिती ज्या साहित्याचे स्वरूपात उपलब्ध असेल उदा. :– अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, टिपणी इत्यादींच्या छायांकित प्रती उपलब्ध करून घेणे असा आहे. कोणत्याही प्रकारच्या निर्णय प्रकरणांतील प्रक्रियेतील कार्यवाहीच्या संदर्भातील कारणमिमांसा ही अधिनियमाचे (तरतुदीप्रमाणे) व्याप्तीत अपेक्षित नाही. अपीलकर्ता यांचेवर अन्याय झाला आहे त्यांची अशी त्यांची समजुत असेल तर त्याकरिता त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे सक्षम अधिका–यांकडे किंवा सक्षम न्यायाधिकरणांकडे तक्रार दाखल केल्यास न्याय मिळवून घेता येईल. त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक 31.7.2006 रोजी उपलब्ध करून दिलेली माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करून दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांनी दिनांक 21.7.2006 च्या अर्जातील मागितलेली माहिती प्रमाणे दिनांक 31.7.2006 रोजी 5 मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करून दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर.

दिनांक 12.3.2008

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**